
माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

आरएनआय रजि नं. MAHMAR/2011/40781 www.rtimahasangh.weebly.com

वर्ष १० वे. अंक ४ था रायगड-पनवेल दिनांक १ ते ३० एप्रील २०२१ पाने १० किंमत २० रूपये



## अपिल सुनावणीतला गाढवपणा थांबवा, महसूल संहितेप्रमाणे आदर्श प्रक्रिया राबवा.

## रस्त्यावरच्या खड्ड्यास कोण जबाबदार हाय, रस्ता खराब असेल तर वापरा आरटीआय !






## माणूसकीची लस कोठे मिळेल ?



## बेस्ट ॲक्टिविस्ट ऑफ द मंथ

मासिक **नागरिक अधिकार**

सुभाष बसवेकर
● संपादक ●

शेखर कोलते
●कार्यकारी संपादक●

जिल्हा - प्रतिनिधी

जयवंत टेंबूलकर (मुंबई)
प्रभाकर गंगावणे (रायगड)
अब्राहम आढाव (पुणे)
संतोष कदम (सातारा)
बंडोपंत चौगुले (सांगली)
अर्जन रामा असणे (जळगांव)
सोपान पवार (औरंगाबाद)
बळवंत जाधव (लातूर)
जयसिंग सिल्लोडे (जालना)
विलास प्रताप शिंदे (नांदेड)
गोपाळ तौर (बीड)
रोहिदास सावळे (धुळे)
रविकुमार गोरे (हिंगोली)
नामदेव चापके (परभणी)
उज्ज्वल राजपूत (नाशिक)
राजू शिंदे (नंदूरबार)
संतोष जाधव (यवतमाळ)

पत्ता : **नागरिक अधिकार**
शॉप नं.०१ सेक्टर ०९ खांदा कॉलनी
नवीन पनवेल ४१०२०६
मो.९२२३५१६९२०
e- mail : mediamansubhash@gmail.com

अंक दर महिन्याच्या एक तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

## संपादकीय..........

# माणूसकीची लस कोठे मिळेल ?

आजकाल कोरोनाच्या लस घ्या आणि आपले जीवन सुरक्षीत करा.असा प्रचार व प्रसार जोरात सुरु आहे.खरी किंवा खोटी का होईना आज कोरोनाची लस उपलब्ध आहे व ही कोरोनाची लस घेतल्याने खरचं कोरोना गायब होईल काय ? नक्की सांगता येत नाही तरही कोरोनाच्या लस कदाचित उपयोगी सुद्धा उपयोगी ठरु शकेन.

अशा प्रगत शोधामुळे काही दिवसांनी कोरोना संपूनही जाईल असी आशा आपण करायला हरकत नाही.

एक वर्षात आपण कोरोनाची लस शोधली ही आपली आरोग्य क्षेत्रातली उपलब्धी मानता येईल.पण हजारो वर्षे लोटली मानवी संस्कृती स्थिर झालेली आहे.पण आम्ही अजूनही माणसाबरोबर माणसासारखे वागत नाही.आम्ही माणसा-माणसामध्ये भेद करतो. धर्म, जात, पंथ, पक्ष,रंग,लिंग, प्रांत,भाष अशा कितीतरी भेदामुळे आम्ही माणसा-माणसांमध्ये भिंती बांधल्या आहेत.

आजच्या अति विकसीत प्रगत तंत्रज्ञानांच्या काळात एक माणूस दुसऱ्या माणसांचा द्वेष करतो. इतकेच नव्हे तर या प्रगत तंत्रज्ञांनाचा द्वेष करण्यासाठी गैरवापरही करतो.

माणसांला सूर्य व पृथ्वी यांच्यातलं अंतर अचूक मोजता आलं पण माणसांला अजूनही आपल्या दोन मनातलं अंतर मोजता येत नाही. माणसांला गणित अर्थशास्त्र,विज्ञान व शेअर बाजार सगळं कळतं पण अजूनही माणूसकी कळत नाही.माणूस जितका शिकला व सुरक्षीत झाला तितका तो अहंकारी झाला आहे.

माणसांने हजार रोगावरील हजार लसी शोधल्या आहेत पण....

माणसांतला अहंकार संपविणारी,द्वेष घालविणारी माणूसकीची लस कोणी अजून पर्यंत कोणीच शोधून काढलेली नाही.

मानव अधिकारांचे प्रचंड हनन, पर्यावरण व निसर्गांचे प्रंचड शोषण यात माणूस आज सर्वाधिक आघाडीवर आहे.

माणसांने माणसाला माणसाप्रमाणे वागवावे. इतकं साध व सरळ सुत्र अजूनही माणसाला पाळता येत नाही.ही मानवजातीची शोकातिंका आहे.

ज्ञान व शहाणपण सांगून माणूस शहाणा होत नाही हे आजपर्यंत च्या प्रयत्नातून पडताळून झालेलं आहे.

कोणी तरी अशी लस शोधा रे ! जी माणसाला गुपचूप देता येईल व मग माणूसही नकळत माणसासारखा वागायला लागेन.

# महसूल संहितेप्रमाणे आदर्श प्रक्रिया राबवा अपिल सुनावणीतला गाढवपणा थांबवा !

जनमाहिती अधिकारी यांनी तीस दिवसांत माहिती दिली नाही. किंवा समाधान कारक माहिती दिली नाही म्हणून अर्जदार अपिल करतो.अपिलीय अधिकारी यांनी तीस दिवसात व अपवादात्मक परिस्थितीत ४५ दिवसात सुनावणी घेऊन अपिल निकाली काढून अर्जदारास माहिती मिळेल हे निश्चित केलं पाहिजे.पण बहुतेक वेळा प्रथम अपिलीय अधिकारी हे ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये ठरवून दिलेल्या मापदंडानुसार सुनावणी घेत नाहीत. महसूल संहिते प्रमाणे माहिती अधिकार कायद्यामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी हा एक प्रकारचा अर्धन्यायीक अधिकारी असतात. त्यांना तात्पूरता का होईना न्यायाधिशांचा दर्जा असतो.महसूल संहितेने ठरवून दिलेल्या आदर्श सुनावणी पद्धतीचा अपिलीय अधिकारी गंभीरपणे वापर करीत नाहीत.

प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीच्या वेळी खालील प्रमाणे चुकीचे व बेकायदेशीर कृत्य करून माहिती अधिकार अर्जदारांस त्रास देण्याचे कार्य करतात.

### हा त्रास खालील प्रमाणे

१.आपल्या कनिष्ठ सहकाऱ्यांच्या चूका व भ्रष्टाचार लपविणे.

२.पदाचा गैरवापर करूनअर्जदारांवर दबाव आणणे.

३.अर्जदारांस त्यांची बाजू मांडण्याची संधी न देणे.

४.जनमाहिती अधिकाऱ्यांचा चूकांचा बचाव करणे.

५.अर्जदारांचे नैतिक खच्चीकरण करणे.

६.अर्जदारांस उपस्थित राहता येऊ नये हे लक्षात घेऊन सुनावणीचे पत्र उशिरा पाठविणे.

७.सुनावणीच्या दिवशी ठरलेल्या वेळेवर सुनावणी न घेता खूप उशिर करणे.

८. ठरलेली सुनावणी ऐनवेळी रद्द करणे.

९. सुनावणीचे निकालपत्र देण्यास विलंब करणे.

१०..संपूर्ण न्यायप्रक्रिया धाब्यावर बसविणे.

**अपिलीय अधिकारी हे एक प्रकारचे न्यायाधिशच असतात.**
**न्यायाधिश चांगला की वाईट हे न्यायाधिशांच्या चेहऱ्यावरुन किंवा व्यक्तीमत्वांवरुन ठरत नाही.**
**न्यायाधिश चांगला की वाईट हे न्यायाधिशांच निकालपत्र सांगतं.**
**न्यायाधिशांची प्रतिमा त्यांच्या निकालपत्रात व दिलेल्या न्यायात प्रतिबिंबीत होत असते.**
**न्यायाधिशांनी नैसर्गिक न्याय केला पाहिजे.**
**न्याय प्रक्रियेचे ठरलेले मापदंड असतात.असे मापदंड न पाळणारा न्यायाधिश खराब असतो.**

### अपिलीय अधिकारी यांनी कसं वागलं पाहिजे ?

१.अपिलीय अधिकारी यांनी तटस्थ,निष्पक्ष असलं पाहिजे.

२.अपिलीय अधिकारी यांनी दोन्ही पक्षाविषयी पूर्वग्रहदुषित नसलं पाहिजे.

३.अपिलीय अधिकारी यांना प्रकरणांची गुणवत्ता समजली पाहिजे.

४.अपिलीय अधिकारी यांनी प्रकरणांच्या गुणवत्तेची महत्ता समजून घेतली पाहिजे.

५.अपिलीय अधिकारी यांनी न्यायदानाची प्रक्रिया ठरलेल्या मापदंडानुसार पार पाडली पाहिजे.

६.अपिलीय अधिकारी यांच्या निकालात न्याय असला पहिजे.

७.अपिलीय अधिकारी यांच्या निकालात न्याय दिसला पाहिजे.

८.अपिलीय अधिकारी यांच्या वागणूकीतून व कार्यातून एक आश्वत्व सकारात्मक व विस्वसनिय असा संदेश गेला पाहिजे.

# महसूल संहितेप्रमाणे आदर्श प्रक्रिया राबवा अपिल सुनावणीतला गाढवपणा थांबवा !

**सुनावणीस ठरलेल्या वेळेपेक्षा खूपच विलंब केला असेल तर किंवा सुनावणी रद्द केली असेल तर अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात पुढील प्रमाणे लेखी तक्रार पत्र द्या.**

प्रति
अपिलीय अधिकारी
कार्यालय ---------------------
पत्ता -------------------------
अर्जदार नाव व पत्ता -------------------
महोदय,

आज दिनांक------- रोजी वेळ .... वाजता माझ्या माहिती अधिकार अपिलांची आपल्या कार्यायालात आपल्याकडे पूर्वनियोजित सुनावणी होती.
ठरलेल्या वेळे प्रमाणे मी आज सुनावणीसाठी उपस्थित होतो.
पण एक नागरिक म्हणून मलाआपल्या कार्यालयात आलेला अनुभव खेदजनक आहे. त्याचे कारण खालील प्रमाणे.

कारण क्र.१ सुनावणीस एक / दोन / तीन चार / तास विलंब झाला आहे.
या अनपेक्षीत विलंबामुळे माझा वेळ वाया गेला.

कारण क्र.२ आपण कोणतीही पूर्वसूचना न देता सुनावणी अचानक रद्द केलीत.
यामुळे माझा वेळ व येणे प्रवासांचा पैसा व्यर्थ गेला.

आपल्या सारख्या उच्च पदस्थ व जबाबदार लोक सेवकांकडून मला अशी अपेक्षा नव्हती.
तरी निषेध म्हणून व दुसऱ्या अपिलामध्ये माहिती आयुक्तासमोर पूरावा राहवा म्हणून मी आपल्या कार्यालयास मी हे पत्र देत आहे.
स्थळ व दिनांक

आपला विस्वासू सही.

१.असे पत्र अपिल अधिकारी कार्यालयात जमा करून एका प्रतीवर त्या कार्यालयातील सही शिक्का घ्यावा.
२. नको असलेले कारण खोडावे किंवा अर्जात लिहू नये.

## महसूल संहिता नुसार प्रथम अपिल सुनावणी कामकाजांची आदर्श पद्धत

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्य सुनावणीत जर खालील दहा भाग स्पष्ट दिसत असतील तर ती सुनावणी आदर्श सुनावणी ठरते.

१. अर्जदार नाव व पत्ता पटलावर नोंदवून घेणे
उपस्थीत / अनुउपस्थित (हे निकाल पत्रात नमूद करणे)

२. प्रतिवादी जनमाहिती अधिकारी नाव व पत्ता
उपस्थीत / अनुपस्थित (हे निकाल पत्रात नमूद करणे)

३. अपिलाची पार्श्वभूमी व वस्तूस्थिती समजावून घेणे

४. अर्जाच्या पुठ्यर्थ अजदारांचे तोंडी वा लेखी निवेदनातील महत्त्वाचे मुद्दे (मेरीट पॉईट) ऐकूण व समजावून घेणे.

५. अर्जदार यांनी दाखल केलेल परिस्थितीजन्य पुरावे यांची पटलावर दखल घेणे

६.प्रतिवादी जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे
बचावाचे मुद्दे ऐकून घेणे

७.प्रतिवादी यांनी दाखल केलेले परिस्थितीजन्ये पुरावे यांची पटलावर दखल घेणे

८.निकालात निर्ष्कषांची मुद्देनिहाय तपशीलवार कारणमिमांसा लिहिणे

९. थोडक्यात व स्वयंस्पष्ट असे आदेश लिहणे
१०. स्थळ दिनांक व सही.

# रस्त्यावरच्या खड्ड्यास कोण जबाबदार हाय, रस्ता खराब असेल तर वापरा आरटीआय !





ग्रामीण भागातील बहुतेक रस्ते हे खराब असल्याचं दिसून येतं. रस्त्यावर खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ते आहेत हेच कळत नाही. अशा रस्त्यावरुन प्रवास करताना कमरेला झटका आणि पार्श्वभागाला फटका बसतो म्हणजे बसतोच.

असे झटके व फटके बसलेले लोक मग सरकारच्या नावाने शिमगा करता. बांधकाम खात्याचा उद्दार करतात. कोणी-कोणी तर कंत्राटदार व इंजिनिअरची आई-बहिण काढतात. ही वस्तूस्थिती आहे.

अशा रस्त्यावरुन प्रवास करणं म्हणजे नुसती वैतागवाडी, कटकट आणि मनस्ताप सुद्धा असतो !

रस्त्यात खड्डे आहेत म्हणजे रस्त्यांच्या कामात संबंधीतांनी भरपूर मलाई खाल्ली असणार हे उघड गुपीत असतं.

चिडीया चूग गयी खेत ! शिव्या देऊन व उद्दार करून रस्त्या थोडाच दुरुस्त होणार आहे. खड्डा थोडाच भरला जाणारं आहे.

अशा वेळी काय करायचं याची एक आयडीया आहे.

असे खड्डे पडले यांस कोण जबाबदार आहे ? हे तुम्ही शोधू शकता.

रस्ता खराब आहे यात कोण दोषी आहे ? हे उघड करू शकता.

खड्डे भरुन रस्ता दुरूस्त करण्यासाठी माहिती मिळवून तुम्ही यंत्रणेवर दबाव आणू शकता ....

होय सामान्य नागरिकांमध्ये ही शक्ती आहे ?

नक्कीच सरकारी यंत्रणेवर दबाव आणून तिला कामाला लावण्यासाठी तुमच्यासारख्या सामान्य नागरिकांकडे एक अस्त्र आहे.

त्यांच नाव आहे माहितीचा अधिकार ! Right To Information अर्थात आरटीआय !!

होय, माहितीचा अधिकार वापरुन व एक अर्ज करून आपण प्रशासनातील कोणत्याही खराब गोष्टी एक्सपोज करू शकतो.

अर्थात त्यासाठी आपण आरटीआय हे परिवर्तनाचं हत्यार वापरायचं व स्मार्ट सिटीजन व्हायचं. दक्ष नागरिक व्हायंच.

पहिल्यांदा खड्डे पडलेला रस्ता कोणांच्या ताब्यांत आहे हे शोधायंच.

१.गावातले रस्ते हे ग्रामपंचायत /नगर पंचायत च्या ताब्यात व नियंत्रणता असतात.

२. दोन गावामधील रस्ते हे जिल्हा परिषद बांधकाम

# रस्त्यावरच्या खड्ड्यास कोण जबाबदार हाय, रस्ता खराब असेल तर वापरा आरटीआय !

विभाग यांच्या ताब्यात व नियंत्रणांत असतात.

३. दोन मोठ्या शहरांना जोडणारे रस्ते हे बहुदा सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्लूडी)च्या ताब्यात असतात.

४.शहरांच्या अंतर्गत रस्ते हे महापालिका किंवा नगरपालिका यांच्या ताब्यात असतात.

पहिल्यांदा हे माहिती करून घ्यायचं की खड्डेमय व खराब रस्ता वरील पैकी कोणत्या सरकारी यंत्रणेच्या कार्यालयाच्या नियंत्रणांत आहे. मग त्या सरकारी कार्यालयामध्ये माहिती अधिकार अर्ज करून खराब रस्त्यांच्या विषयी माहिती मागवायची.

वरील प्रत्येक सरकारी यंत्रणेच्या कार्यालयात माहीती देण्यासाठी शासनानं जनमाहिती अधिकारी नियुक्त केला असतो.

मग योग्य त्या कार्यालयाकडे माहितीचा अर्ज करायचा. अर्जाचा साधारण नमूना ठरलेला आहे. त्यात साधारण खालील टप्पे असावेत.

१.कोऱ्या कागदावर अर्जात वर माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज असं लिहा.

२.मग जनमाहिती अधिकारी यांचा पदनाम व पत्ता लिहा.

३.त्यानंतर अर्जदारांचा नाव व पत्ता व संपर्क नबंर,

४.अर्जाचा विषय : इथून -इथंपर्यंतच्या (रस्त्यांच्या दोन टोकांची ठिकाणे सांगून ) रस्त्यांची पुढील प्रमाणे माहिती मिळणेबाबत.

५.माहितीचा कालावधी म्हणजे : रस्ता बांधायच्या अधिपासून तसेच दुरूस्त केल्याच्या अगोदरपासून आजपर्यंत असं लिहा.

६.माहितीचा तपशील मध्ये :

१ )सदर रस्ता बांधताना / दुरूस्त करतानां कंत्राटदारांसोबत केलेल्या कराराची (contract agreement) प्रत

२) काम सुरू केल्याचा आदेश (work order) ची प्रत.

३) कामाचा तांत्रिक अहवाल

४) कामाच्या मोजमाप पुस्तिका

५) रस्ता बांधकामांच्या गुणवत्ता नियंत्रण व निरिक्षण नोंदी

६) कामाची मंजूर केलीली सर्व देयके

७) कामाचा दोष दायित्व कालावधी (defects liability period)

८) रस्त्यांच्या दुरूस्तीच्या प्रलंबीत वा मंजूरीच्या प्रतिक्षेतील प्रस्ताव.

अशी साधारण आठ मुद्यात माहिती मागा.

टीप : दोष दायित्व कालावधी म्हणजे रस्ता बांधल्यानंतर किती कालावधी पर्यंत चांगल्या स्थितीत राहील यांची कंत्राटदाराने दिलेली हमी व जर सदर कालावधीत रस्ता खराब व खड्डेमय झालाा तर तो स्वखर्चाने दुरूस्त करून देण्याची दिलेली हमी होय.

हे समजून घ्या.

असा हमी कालावधी अजून पूर्ण झाला नसेल तर रस्ता बांधलेल्या कंत्राटदारास खड्डे बूजवून रस्ता दुरूस्त व ठिक करून द्यावा लागेल.

वरील मुद्दे वाचले तर जनमाहिती अधिकारी तुम्हाला येड्यात काढण्याची हिमंत करणार नाही.

तुमचा असा व्यवस्थीत माहिती अधिकार अर्ज गेला की त्या विभागातील कार्यकारी अभियंता यांचेकडून सदर रस्ता ठिक व दुरूस्त करण्याच्या प्रक्रियेची सुरूवात होण्याची जास्तीत जास्त शक्यता निर्माण होते.

रस्त्यांची वरील प्रमाणे सर्व माहिती तुमच्या हातात आली की मग रस्त्यांच्या खड्ड्यास कोण जबाबदार आहे ?

रस्ता कधी व केव्हा दुरूस्त होऊ शकतो ? यांचा साधारणत: एक अचूक अंदाज तुम्हाला येऊ शकतो.

मग यांची एक छान बातमी करून प्रसिद्ध करा. त्याची एक छान पोष्ट लिहून सोशल मिडीयावर टाका.

नुसत्या शिव्या देऊन भागणार नाही. फक्त स्वत:ला मनस्ताप करवून घेऊन प्रश्न सुटणार नाही.

हिंमत करा. आरटीआय ठोका. हे प्रश्न सोडविणारं. नागरिकांची शक्ती दाखवून देणारं सुंदर शस्त्र आहे.

**रेडीमेड अर्ज नमूना पुढील पानावर**

# रस्त्यावरच्या खड्ड्यास कोण जबाबदार हाय, रस्ता खराब असेल तर वापरा आरटीआय !

## रेडीमेड अर्ज नमूना

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जन माहिती आधिकारी

जि प.रस्ते व बांधकाम विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग

पत्ता : -----------------------

जिल्हा ----------------------

१) अर्जदाराचे नांव : -----------------------------------------------------------------

२) पत्ता : -------------------------------------------मोबाईल नंबर --------------------------

३) माहितीचा विषय - -------- ते ------ या दरम्यानच्या रस्त्यांच्या बांधकामांची व दुरूस्तीची माहिती मिळणेबाबत

४) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (रस्ता निर्मितीच्या अगोदर पासून आजपर्यंत)

१ )सदर रस्ता बांधताना / दुरूस्त करतानां कंत्राटदारांसोबत केलेल्या कराराची (contract agreement) प्रत

२) काम सुरू केल्याचा आदेश (work order) चीप्रत.

३) कामाचा तांत्रिक अहवाल

४) कामाच्या मोजमाप पुस्तिका

५) रस्ता बांधकामांच्या गुणवत्ता नियंत्रण व निरिक्षण नोंदी

६) कामाची मंजूर केलीली सर्व देयके

७) कामाचा दोष दायित्व कालावधी (defects liability period)

८) रस्त्यांच्या दुरूस्तीच्या प्रलंबीत वा मंजूरीच्या प्रतिक्षेतील प्रस्ताव.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण : -------------

दिनांक : / / (अर्जदाराचे नाव : ----------------------)

# बेस्ट ॲक्टविस्ट ऑफ द मंथ, अरिफ नूरा पटेल ,जळगांव





मित्र हो !

**आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे कार्य करताना कार्यकर्त्यांमध्ये उत्साह व चैतन्य निर्माण व्हावे या साठी एप्रील २०२१ पासून प्रत्येक महिन्याला उत्तम व समाजउपयोगी कार्य केल्या बद्दल कार्यकर्त्यांचा बेस्ट ॲक्टीव्हिस्ट ऑफ द मंथ असा पुरस्कार देऊन गौरव करणार आहोत.**

या उपक्रमातील पहिल्या पुरस्कारांचे मानकरी आहेत.

**अरिफ नूरा पटेल ,जळगांव.**

नूरा पटेल हे मु.पो.बोरनार ता.जि.जळगांव येथे वास्तवास असतात.गावात त्यांनी शिव प्रतिष्ठान संघटना स्थापन केलेली आहे. सद्या ते माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे जळगांव जिल्हा अध्यक्ष या पदावर कार्यरत आहेत. तसेच जिल्हा विधी व सेवा प्राधिकरण जळगांव येथे समांतर विधी सहाय्यक या पदावर कार्य करीत असून त्या माध्यमातून गरीब व सामान्य जनतेला कायद्याचे ज्ञान व्हावे शासनांच्या योजना समजाव्यात व कायद्याच्या माध्यमातून त्यांचे प्रश्न सुटावेत व जगणे सोपे व्हावे म्हणून कार्यरत आहेत.सामाजिक कामासाठी कोणाकडूनही एक रूपयांसुदृधा घेत नाहीत.

पटेलसर त्यांच्या गावात व परिसरात अनाथ व गरीब मुलांनासाठी मोफत कोचिंग क्लास चालवितात.

गावतील विधवा महिलांना मासिक शासकीय वेतन मंजूर करून दिले.

गरजु महिलांना कुटुंब सहाय्य योजनेतून वीस हजारांचा लाभ मिळवून दिला.

मागसावर्गीय काही लाभधारकांस पन्हाळी पत्रे मिळवून दिले.

गरजू महिलांना शिलाई मशीन मिळवून दिल्या.

सरकारी काम अडलेल्या व्यक्तीला माहितीचा अधिकार वापरून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.

माहितीचा अधिकार हा कायदा सर्व समान्य जनतेला शिकवण्यिास सतत प्रयत्नशील असतात.

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ ही आपली संघटना शक्तीशाली व मजबूत व्हावी म्हणून सभासद नोंदणी व प्रचार व प्रसार या कार्यात अरिफ नूरा पटेल सर हे सतत अग्रभागी असतात.

या कार्याबद्दल अरिफ पटेल सर यांचा युवक मित्र संघटना पूणे यांचेकडून स्वामी विवेकानंद पुरस्कार मिळालेला आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाद्वारे श्री.अरिफ नूरा पटेल,जळगांव यांचा द बेस्ट ॲक्टीविस्ट ऑफ द एप्रील २०२१ साठी निवड झाली असून लवकरच प्रत्यक्ष कार्यक्रमात सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव केला जाणार आहे.

# सजग नागरिक आणि चांगला माणूस बना.

पुढील दहा लक्षणं असणारा सजग नागरिक व चांगला माणूस घडवणं या साठी निरंतर प्रयत्न करत राहणं हाच माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा व नागरिक अधिकार अभियान यांचा कृतिकार्यक्रम आहे.



१. नागरिक म्हणजे : समाजाच्या हितामध्ये स्वत:च हित व स्वत:च्या हितामध्ये समाजांच हित पाहणारा व सर्वांच्या हितासाठी, भल्यासाठी कायम सक्रीय असणारा मनुष्य.

२.नागरिक म्हणजे : कोणतेही सार्वजनिक काम वा जबाबदारी द्या. ती अतिशय प्रामाणिकपणे व विस्वासार्हतने पूर्ण पार पाडणारा अफलातून व विकसनशील मनुष्य.

३. नागरिक म्हणजे : स्वत: स्वयंस्फूतपणे देशातील कायदे व नियम पाळणारा व इतरांनी ते पाळले पाहिजेत असा आग्रह धरणारा व त्यासाठी किंमत मोजणारा कृतिशील मनुष्य.

४.नागरिक म्हणजे : स्वत:च्या अधिकाराविषयी जागरूक असणारा व इतरांच्या अधिकारांची जपवणूक झाली पाहिजे. कोणाच्याही अधिकारांचं हनन नाही झालं पाहिजे, असं मत असणारा व तसंच वागणारा सावध मनुष्य

५.नागरिक म्हणजे : कायदे , नियम, मूल्य, तत्व आणि निती यांची जाणीव पूर्वक जपवणूक व पालन करणारां उन्नत मनुष्य.

६.नागरिक म्हणजे : आपला सन्मान, आपले जिवित व आपली मालमत्ता यांचे रक्षण करताना इतरांचा सन्मान इतरांचे जिवीत व इतरांची मालमत्ता यांना तसूभरही हानी होऊ नये याची काळजी घेणारा चांगला मनुष्य.

७.नागरिक म्हणजे :स्वत:चे विचार, स्वत:चे मत व स्वत:ची वागणूक यात एकजिनसीपणा व समानता असावी म्हणून पराकोटीचा दक्ष असणारा मनुष्य.

८.नागरिक म्हणजे :अधिकारांचे अतिमत: सरंक्षण फक्त संर्वागिण कर्तव्यातूनच होते. यावर संपूर्ण विस्वास असणारा कर्तव्य कठोर मनुष्य. प्रथम कर्तव्य मग अधिकार हे मूल्य माननारा माणूस.

९. नागरिक म्हणजे : घरात, नातेवाईकांत, शेजाऱ्यांशी व गल्लीत वागताना पूर्ण लोकशाही व पूर्ण न्याय पूर्ण सत्य या तत्वांनुसार जगणारा मनुष्य.

१०.नागरिक म्हणजे : जीवजंतू,प्राणीमात्र, वृक्षराजी व पर्यावरण यांचे रक्षण झाले पाहिजे म्हणून स्वत:चे योगदान देणारा निर्सगस्नेही मनुष्य.


**रेडीमेड अर्ज नमूने आजच खरेदी करण्यासाठी खालील लिंक गुगल सर्च करा.**

**www.instamojo.com/subhashbaswekar**


















**www.rtimahasangh.weebly.com**

**www.facebook.com/rtimahasangh/**

**Whats App - 9223516920**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, फ्लॅट-३०५ वसूधा सोसायटी प्लॉट नं.५३ सेक्टर-४-बी आसूडगांव खांदा कॉलनी ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे प्रकाशीत केले. RNI रजि नं. MAHMAR/2011/40781